महाराष्ट्र शासन

# राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई

( प्रि आय ए एस ट्रेनिंग सेंटर )

हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस् समोर , मुंबई-४०० ००१.
दूनध्वनी क्रमांक-०२२-२२०७०९४२ वेबसाईट-www.siac.org.in /ईमेल-siac1915@gmail.com

## प्रवेश परीक्षा-२०१८

**( UPSC ,नागरी सेवा परीक्षा- २०१९ (IAS/IFS/IPS .etc.) च्या परीक्षापूर्व प्रशिक्षण - २०१८-१९ )**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा -२०१९ च्या पूर्व प्रशिक्षणाकरीता ११ महिने पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था , मुंबई येथे प्रवेशासाठी **प्रवेश परीक्षा रविवार दिनांक ०४ नोव्हेंबर २०१८ रोजी फक्त मुंबई केंद्रावर** घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत .

**१.प्रवेश क्षमता** :एकूण- **१२०** पैकी १) SIAC संस्थेची प्रवेश क्षमता : **१००** २) अल्पसंख्यांक आयोग (MINORITY) द्वारा अनुदानीत -**१०**
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे (BARTI ) द्वारा - अनुदानीत -**१०**

**२.प्रवेश परीक्षा पध्दत : प्रवेश परीक्षा एकूण-२०० गुणांची असून , UPSC ,नागरी सेवा (पूर्व ) परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहिल.**

| विषय | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | माध्यम | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| सामान्य अध्ययन Section -I GS | ५० | १०० | English/Hindi | सकाळी-११.०० ते ०१.०० वाजेपर्यत- **एकूण -२ तास** | वस्तुनिष्ठ **Objective type (MCQ) Negative marking one-third (०.३३) of the marks assigned to that question** |
| सामान्य अध्ययन Section - II CSAT | ४० | १०० | **English/Hindi** | | |
| **सामान्य अध्ययन Section - II CSAT हा qualifying section असल्याने किमान ३३% म्हणजे १०० गुणांपैकी ३३ गुण असणे अनिवार्य आहे.** | | | | | |

### ३. पात्रतेच्या अटी :

३.१ उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे ( **Domicile of Maharashtra Certificate** ) किंवा उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवासी असल्यास शासन निर्णय क्र. रा.प्र.व्य १०१८(/१७१/९८)/ म.शि.-१ दिनांक २४.४.२००० नुसार प्रवेश पात्रता

**३.२ शैक्षणिक अर्हता** : ३.२.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण (कोणत्याही शाखेची पदवी ) किंवा प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षेचे मार्कशिट आवश्यक आहे.

**३.३ वयोमर्यादा : वय- २१ ते ३२वर्षे** - खुला संवर्ग , **वय-२१ ते ३५ वर्षे** -इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./भ.ज.,**वय- २१ ते ३७ वर्षे** -अनुसूचित जाती / जमाती
( सदर वयोमर्यादा युपीएससी प्रमाणे असून **दि. ०१ ऑगस्ट २०१९** रोजी उमेदवाराचे वय कमी किंवा जास्त नसावे )

३.४ एस आय ए सी संस्थेमध्ये पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षाकरीता प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही.

३.५ संस्थेच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमात सहभाग घेता येणार नाही.

३.६ वैद्यकीय पदवी धारकांनी **intership** पूर्ण करणे आवश्यक आहे.

### ४. अर्ज करण्याची पध्दत :

४.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील.इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

४.२ ऑनलाईन अर्ज www.siac.org.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १३.८.२०१८ ते दि. १४.९.२०१८** या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे.

### ५. प्रवेश परीक्षेकरीता शुल्क- ( ऑनलाईन पेमेंट किंवा चलनाद्वारे) -

५ .१ खुला संवर्ग- रु.**३००/-** ५.२ इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./भ.ज./ अनुसूचित जाती / जमाती - **रु.१५०/-**

५.२ ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल किंवा

५.३ चलनाद्वारे शुल्क जमा करण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये विहित चलनाद्वारे शुल्क अर्ज सादर केल्याच्या दोन दिवसानंतर परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. कालावधी **दिनांक- १६.८.२०१८ ते दि.१९.९.२०१८** पर्यंत आहे.

### ६. प्रवेश परीक्षा संबंधी :

६.१ प्रवेश परीक्षा अर्ज स्वीकारण्याचा शेवटचा दिनांक **१४ .९.२०१८** असून त्यानंतर वेबलिंक बंद होईल.

६.२ प्रस्तुत परीक्षेपूर्वी उमेदवारास प्रवेश पत्र दिनांक **२३.१०.२०१८ ते ०४.११.२०१८** पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल.

६.३ संस्थेतील प्रवेश व मर्यादित वसतिगृह प्रवेश उपलब्धतेनुसार गुणवत्ता व प्रचलित शासन निर्णय नियमांनुसार प्रवेश देण्यात येतील.

६.४ परीक्षेचा अभ्यासक्रम , परीक्षेसंबंधी सर्व माहिती , सूचना संस्थेच्या www.siac.org.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-
**डॉ.म.बा.भिडे**
**संचालक ,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक :१३.०८.२०१८**